2022-2023

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2279 - 0489
AN INTERNATIONAL
MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH
JOURNAL

# GENIUS



Volume - XI, Issue - II
February - July - 2023
English / Marathi Part - I

Impact Factor / Indexing
2023 - 7.508
www.sjifactor.com

Ajanta
Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १० | छिन्नमनस्कता रुग्णाचे व्यष्टी अध्ययन<br>अश्विनी मारुती पुणेवाड<br>डॉ. रमा अच्युत पांडे | ४९-५४ |
| ११ | अध्ययन अक्षम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासात शिक्षकांची भूमिका<br>जया राहूल शिरसाठ<br>डॉ. रमा अच्युत पांडे | ५५-६० |
| १२ | ग्रामीण समाजातील वाढती व्यसनाधीनता : एक समाजशास्त्रीय अध्ययन<br>प्रा. डॉ. डी. के. कदम | ६१-६५ |
| १३ | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची ग्रामीण विकासातील भुमिका संदर्भ - कोल्हापूर जिल्हा<br>सागर राजाराम सुर्वे | ६६-७१ |
| १४ | खानदेशी लोकसंस्कृतीचे दर्शन घडवणारे लाडके स्त्री दैवत : कानुबाईमाता<br>प्रा. डॉ. प्रकाश श्रीराम साळुंके | ७२-७६ |

VOLUME - XI, ISSUE - II - FEBRUARY - JULY - 2023
GENIUS - ISSN - 2279 - 0489 - IMPACT FACTOR - 7.508 (www.sjifactor.com)

# १२. ग्रामीण समाजातील वाढती व्यसनाधीनता : एक समाजशास्त्रीय अध्ययन

**प्रा. डॉ. डी. के. कदम**
समाजशास्त्र विभाग प्रमुख, हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर, जिल्हा नांदेड.

प्रस्तावना

आधुनिक भारतीय समाजात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यातील व्यसनाधीनता ही एक ज्वलंत समस्या आहे. आजचे तरुण हे देशाची उज्वल भविष्य घडविणारे आहेत. कुटुंब, समाज, देश तरुणांकडून देशाच्या प्रगतीची आणि विकासाची आशा करतात. ज्या पिढीने ज्ञानार्जन करण्यासाठी दिवस-रात्र मेहनत करावी, तीच पिढी दिवसाढवळ्या व्यसनाधीनतेच्या व्यसनातून गुन्हेगारीच्या मार्गाने समाजात दहशत, सामाजिक अशांतता, गुंडगिरी करतांना दिसत आहे. आज भारतीय समाजातील मुले दिवसेंदिवस व्यसनाधीन का बनतात? हा विषय चिंतेचा आणि चिंतनाचा आहे. कारण तरुणाई व्यसनाधीन बनत जाणे, ही समस्या सार्वत्रिक स्वरूपाची आहे. प्रत्येक खेड्यात प्रवेश केल्यानंतर वीडी, सिगारेट तंबाखू चघळणारी गुटखापुडी खाणारी अनेक माणसे दिसून येतात. देशी-विदेशी मद्याचे व्यसन असणारी माणसेही दिसून येतात. व्यसनाचा व आजाराचा जवळचा संबंध आहे. व्यसनामुळे व्यक्तीचे आरोग्य खालावते. त्यांना कष्टाची कामे होत नाहीत. परिणामी कुटुंबातील सदस्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण होत नाहीत. त्यामुळे ताण-तणाव निर्माण होतात. यातून व्यक्ती व्यसनाधीन बनतात. समाजशास्त्रीय सिद्धांतानुसार सामाजिक परिस्थिती व्यक्तीला मादक द्रव्याचा व्यसनी बनवते. मादक द्रव्य आज ग्रामीण भागात देशी दारू हे एकमेव पेय बनले आहे. ग्रामीण भागात काही ट्रॅक्टरमध्ये रेती, मुरूम भरणारे मजूर, मिस्त्रीच्या हाताखाली काम करणारे मजूर, सालगडी, रोजंदारीवर काम करणारे मजूर आणि इतर व्यवसायातील मजूर आपला थकवा घालविण्यासाठी त्याचबरोबर धार्मिक कार्यक्रम विवाहप्रसंगी, वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस, मृत्यूप्रसंगी देशी दारूचे सर्रासपणे सेवन करताना दिसून येतात. तर काहीजण मौजमजा प्रतिष्ठेचे लक्षण समजून मद्यपान करताना दिसून येतात. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधात नांदेड जिल्ह्यातील तरुणांमधील वाढती व्यसनाधीनता एक समाजशास्त्रीय अध्ययन या विषयावर प्रकाश टाकला आहे. कारण व्यसनाधीन समस्येचा विळखा आदिवासी, शहरी, ग्रामीण समुदायाला आहे. परंतु शोधनिबंधात ग्रामीण समुदायातील तरुणांमधील वाढत्या व्यसनाधीनतेचे अध्ययन केले आहे.

व्यसनाधीनता ही समस्या सार्वत्रिक स्वरूपाची समस्या आहे. एखाद्या विशिष्ट कुटुंबात विशिष्ट जाती, धर्म, गरीब, श्रीमंत यापुर्ती मर्यादित राहिली नसून ती सर्वव्यापी असल्याचे दिसून येते. या व्यसनाधीनतेत वाढ होण्यासाठी अनेक कारणे कारणीभूत आहेत. व्यसनाचा परिणाम व्यसन करणाऱ्या एका व्यक्तीवर होत नसून त्याचा परिणाम व्यक्तीवर, कुटुंबावर, संपूर्ण समाजावर होताना दिसून येतो. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधाचे पुढील उद्दिष्ट ठेवून अध्ययन केले आहे.

अध्ययनाची उद्दिष्टे

1. व्यसनाधीनता एक सामाजिक समस्या यांचा अभ्यास करणे.
2. व्यसनाधीनता वाढण्यास कारणीभूत असणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.
3. व्यसनाधनतेमुळे समाजात चारित्र्यसंपन्न व्यक्ती निर्माण होण्यास अडथळा निर्माण होतो का? याचा अभ्यास करणे.

तथ्य संकलन

प्रस्तुत शोधनिबंधाचे अध्ययन करताना संशोधनासाठी प्राथमिक व द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब केला आहे.

तथ्य विश्लेषण

व्यसनाधीनता दिवसेंदिवस झपाट्याने वाढत असून व्यसनाधीनतेमुळे तरुण मुलाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत चालला आहे. सर्वच तरुण व्यसनाधीन बनले आहेत असे नाही. परंतु काही उघडपणे तर काहीजण लपून-छपून मद्य सेवन करण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. हे वास्तव नाकारता येत नाही. व्यसनाधीमुळे समाजात गुन्हेगारी प्रवृत्तीत वाढ होताना दिसून येते. व्यसनाधीनतेमुळे तरुण वर्ग हट्टी बनत चालला आहे. त्याबरोबरच मानसिक शारीरिक विकृती निर्माण होत आहे. आज लहान मुलांकडे जेवढ्या प्रमाणात लक्ष द्यायला पाहिजे तेवढे लक्ष मुलावर दिले जात नाही. तीच मुले नंतर तरुण वयात व्यसनाधीनतेच्या आहारी जाताना दिसून येतात. नांदेड जिल्ह्यात ग्रामीण भागात अनेक ठिकाणी दारू विकणारी दुकाने, देशी दारूचे दुकाने विशेषतः मागासवर्गीय व दलित वस्त्यांच्या आसपास पाहायला मिळतात. उच्चभ्रू वस्तीत अशी परवानाधारक दुकाने नसतात. यास काही प्रमाणात स्थानिक प्रशासन व पोलीस खाते ही जबाबदार असल्याचे दिसून येते. अनेक दलित वस्त्यांमध्ये विना परवाना चोरून छुप्या मार्गाने पोलीस खात्यांना धरून मादक पदार्थाची विक्री केली जात आहे. नांदेड शहरात व जिल्ह्यातही गावोगावी जाणीवपूर्वक मादक पदार्थाची विक्री केली जाते. याकडे मुद्दामहून स्थानिक प्रशासन व पोलीस खाते दुर्लक्ष करीत आहे. याचा परिणाम जागोजागी मादक पदार्थाची विक्री होते. त्याचे सेवन करण्याच्या संकेत दिवसेंदिवस वाढ होताना दिसून येते. नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण समाजात आज प्रत्येक राजकीय पुढारी आपली राजकीय शक्तीचे प्रदर्शन दाखविण्यासाठी निवडणुकांमध्ये रॅली काढली जाते. जास्तीत जास्त लोकांना सामावून घेण्यासाठी त्यांना दारूचे अमली पदार्थाचे व पैशाचे आमिष दाखविले जाते. यातून तरुणाई व्यसनाधीन्तेकडे व गुन्हेगारी प्रवृतीकडे वळली जात आहे. यास समाज व स्थानिक प्रशासन कारणीभूत आहे. आज तरुणाई कोणत्या न कोणत्या व्यसनाने ग्रासलेली आहेत. आजच्या युगात नवनवीन व्यसनाचे प्रकार निघाले आहेत. त्यांची नशा करण्यासाठी तंबाखू, सिगारेट, गुटखा, मावा, खैनी, व्हाईटनर, गांजा, सुलोचन, पेट्रोल, झंडू बाम, ट्रक ऑफिस इत्यादी अनेक प्रकारच्या गुंगी नशा आणणाऱ्या पदार्थ मादक पदार्थांच्या आहारी गेली आहे. त्यामुळे त्यांच्या शरीरावर व मनावर विपरीत परिणाम होतात.

राजकारणाचे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणुकांपासून ते विधानसभा व लोकसभा या निवडणुकीत सर्रासपणे देशी दारूचे वाटप होते. हे वास्तव आहे. या निवडणुकापासून अनेक खेड्यातील तरुणाला व्यसनाकडे ओढल्याचे स्पष्ट होते. कारण आज जवळ सर्रासपणे जवळपास 19 ते 30 या वयोगटातील बरोबरच 31 ते 45 तरुणांमध्ये

व्यसनाचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते. ग्रामीण भागातील तरुणाला वाईट व्यसनाकडे वळण्याची आजचा राजकीय पक्ष कारणीभूत आहे. कारण राजकीय पुढारी आपल्या राजकीय स्वार्थ पूर्ण करण्यासाठी तरुणाला मतदानाच्या चर्चा करण्यासाठी त्यांना मोठमोठी अमिषे दाखवतात. त्यांना मोठेपणा देतात. मी निवडून आलो तर तूच आहेस अशी परिस्थिती निर्माण करतात. व त्या मतदानाच्या चर्चा करताना आज राजकीय पुढारी दारू मटणाच्या पार्ट्या करतात. हे ग्रामीण भागातील तरुणाई या राजकीय पक्षाच्या राजकारणामुळे व्यसनाच्या विळख्यात ओढली जाते हे वास्तव आहे. आज ग्रामीण भागातील दारूचे अवैध दुकाने चालतात. यास कारणीभूत राजकीय पुढारी कारणीभूत आहेत. कारण ही राजकीय पुढारी दारूचे अवैध दुकानांना अभय देतात. स्थानिक पोलीस स्टेशन दारू विक्री करणाऱ्यावर जेव्हा कार्यवाही करते. तेव्हा गावातील छोटे पुढारी म्हणजेच सरपंच, पोलीस पाटील, अनेक राजकीय मंडळी, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य हे आमदार, खासदार, मंत्री यांना फोन करून त्यांच्यावर दबाव आणतात. तेही राजकीय पुढारी पोलीस प्रशासनाला योग्य काम करू देत नाहीत. एवढेच नाही, तर त्यांना बदली करण्याची धमकी दाखवून कार्यवाही करू देत नाहीत. म्हणून आज प्रत्येक गावात अवैद्य देशी-विदेशी दारू विक्री करणारे एक दोन दुकाने तर काही गावात तीन अशी छुपी दुकाने असल्याचे स्पष्ट दिसून आले. ग्रामीण भागात व्यसनाधीनता वाढण्यास ही राजकीय परिस्थिती स्थानिक प्रशासन कसे कारणीभूत आहे. कारण आज सर्रासपणे दारू विक्री करणारा वैद्य ज्यांच्याकडे परवाना आहे तोच आपल्या भागात अवैद्य दारू विक्री करणाऱ्या दारू गावात पोहोचतो. हे वास्तव आहे. पोलीस प्रशासनास अवैद्य दारू विक्री करणाऱ्यांचे हप्ते तेही यांच्यामार्फत पुरविली जातात. म्हणून ग्रामीण भागात तरुणाईत व्यसनाधींचे प्रमाण वाढण्यास गलिच्छ राजकारण, स्थानिक प्रशासन कारणीभूत आहे. ही बाब अतिशय गंभीर स्वरूपाची आहे. राजकीय पुढारी तरुणाची आपल्या हाताशी धरतात. कारण या तरुणांमुळे त्यांच्या कुटुंबातील आई-वडिलांचे मत घेतात. कारण ही तरुण मुले ज्या राजकीय पक्षासोबत असतात, त्यांची आई-वडील त्यांच्यासोबत राहतात. कुटुंबातील वृद्ध आजी आजोबांचे मतदान ही मुले स्वतः करतात. कारण आजी-आजोबांना दिसत नाही हे कारण समोर करून मतदान करतात. हे ग्रामीण भागातील वास्तव आहे. म्हणून तर या राजकारणात व्यसनाधीन वाढत चाललेली आहे की वास्तव आहे. आज गावे, खेडी, वाडी, तांड्यावर सर्रासपणे अवैध दारू विक्री करणारे दुकाने आहेत. काही ठिकाणी खुलेआम तर काही ठिकाणी लपून छपून दारू विक्री होत आहे. राजकारणाचे वारे म्हणजेच निवडणुका संपल्यानंतर जो राजकीय पक्ष निवडणुकात विजय होतो. विजय साजरा करताना ह्या तरुणाईला देशी-विदेशी दारूच्या पार्ट्या देतो. तरुणाईच्या राजकीय पक्षाची बाजू घेतली परंतु तो पक्ष हरला तेव्हा तो अतिशय टेन्शन ताणतणाव असल्यासारखे दाखवून दारू पितो. परिणामी राजकीय निवडणुका संपल्यानंतर ही तरुण आपल्या गावातील अवैध दारू दुकानाकडे वळतात. अगोदर ते तरुण लपून-छपून दारू पितो. याचा परिणाम असा होतो की, त्यापुढे सवयी लागते आणि या सवयीचा परिणाम व्यसनात होतो. आज प्रत्येक गावात तरुण आहेत त्यांचे वय 19 ते 40 असून त्यांना दररोज दारू पिल्याशिवाय जमत नाही. ही कोणत्या न कोणत्या मार्गाने आपल्या सवयीची पूर्तता करतात. व ही व्यसनाधीन बनली आहेत. हे वास्तवता नाकारता येत नाही. गावातील दुकाने ही ग्रामीण भागात व्यसनाधीनता वाढवण्यास कारणीभूत आहेत. गावातील कष्टाची कामे करणारी शेतमजूर, ट्रॅक्टर चालक, ट्रॅक्टरवर रेती मुरूम भरणारे, सालगडी आपल्यापरीने कष्टाची कामे करतात. कष्टाची कामे करणाऱ्या कामगारांना साहजिकच

थकवा येतो. परंतु ही मंडळी आपल्या कामाचा थकवा दारूमुळे जातो. अशी त्यांची मानसिकता बनली आहे. त्यामुळे तरुण दिवसभर काम करतात व संध्याकाळी दारू पितात. कुणी एक विदेशी आपल्या मजुरीतून मालकाला पैसे मागून पितात तर काहीजण अगोदरच्या मजुरीच्या पैशातून दारू पितात. हे वास्तव आहे. देशी दारूची एक 200 मिली ची बॉटल असते. तिला पावशेर असे नावच पडले आहे. त्यात काही जण पावशेर इतर काही जण शंभर ग्राम घेतात. म्हणून दारू पिल्यामुळे नसून दिवसभर कष्टाची कामे केल्यामुळे आपणास झोप लागते. परंतु त्यांना दारूमुळे झोप लागली असे वाटते. आज कष्टकरी कामगार वर्ग म्हणतो. 100 ग्राम जीवाला राम अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

ग्रामीण भागातील राजकारणाबरोबरच कोणताही कार्यक्रम, दुःखद घटना, जन्माचा वाढदिवस तसेच लग्नाचा वाढदिवस हे तरुणाईत व्यसनाधीनता वाढविण्यास कारणीभूत आहेत. कारण वैवाहिक कार्यक्रमाचे आयोजन झाले की वरात आली. कारण वरात काढणे हे ग्रामीण भागातील आज प्रतिष्ठेचे लक्षण निर्माण झाले आहे. पूर्वी वाजंत्री वाजविण्याची साधने डफडे, हलकी, सनई, पुंगी होती. हे आनंदाने सर्वजण वाजंत्री वाजवून आपले वैवाहिक कार्यक्रम साजरी करत होते. परंतु आज या साधनांची जागा डीजे ने घेतली. या डीजेवर लग्नाच्या वराती काढणे आज एक दिवशी लग्नाच्या वेळेपूर्वी अथवा लग्न विवाह झाल्याच्या दिवशी सायंकाळी मोठ्या मोठ्या वरातीचे आयोजन करतात. या वरातीत कुटुंबातील सदस्य आपला आनंद व्यक्त करण्यासाठी नाचत होते ते योग्य होते. परंतु आज या वैवाहिक वरातीचे स्वरूप बदलले आहे. जवळपास वरातीत सहभागी होणारी तरुण मुले हे देशी-विदेशी दारूचे व्यसन करून वरातीत डान्स नाचत असतात हे वास्तव आहे. वरातीत नाचत असताना दारूच्या नशेत किती वेळ झाला याचे भान नाही. अनेक वेळा वराती बंद करण्यासाठी भांडणे तंटे एवढेच नव्हे तर अकोला करणे खून करणे इत्यादी वाईट घटना घडतात. भारतात अनेक महामानवाने आपल्या देशाला समाजाला सुधारण्यासाठी आपल्या आयुष्यभर कार्य केले त्यांच्या जन्मदिवशी या मृत्यू दिवशी त्यांचे वाढदिवस जयंती साजरा केला जात होत्या हा त्यांच्या जयंती साजऱ्या करण्याचा मूळ उद्देश असा होता की त्या नेत्यांनी जे आपले कार्य केले. ते कार्य सर्वसामान्य माणसापर्यंत पोहोचवणे. परंतु आज त्या निमित्ताने वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करतात. परंतु आज हा मूळ उद्देश बाजूला गेला. फक्त जयंती निमित्त डीजे लावणे. मिरवणुका काढणे. या मिरवणुकीत महिलांचा सहभाग तर अतिशय नगण्य आहे. तरुण मंडळी व्यसन करून डान्स करतात हे वास्तव आहे. ग्रामीण भागात, शहरात फक्त काही प्रमुख महामानवाच्या समाजसुधारकांच्या नेत्यांची जन्मदिवस साजरे करत होतो. परंतु आज जन्मदिवस साजरा करण्याचे थैमान पसरले आहे. जवळपास सर्वजण वाढदिवस साजरा करतात. तरुणाई आज वाढदिवसाच्या निमित्ताने व्यसनाधीन होत चालली आहे. हे कारण वास्तव आहे. कारण आज मित्रमंडळी आपल्या मित्राचा वाढदिवस साजरा करताना सकाळपासून संध्याकाळपर्यंत व्हाट्सअप मेसेज, टेक्स्ट मेसेज, फेसबुक, बॅनर जाहिराती याद्वारे वाढदिवसाच्या शुभेच्छा देतात. वाढदिवस साजरा करतात. केक कापतात. तर काहीजण आपल्या वाढदिवसानिमित्त गोरगरिबाला कपडे फळे, अपंगांना, शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून वाढदिवस साजरा करतात. परंतु आज एक विचित्र प्रकार समोर आलेला आहे आजची तरुणाई आपल्या वाढदिवसानिमित्त देशी-विदेशी दारूच्या पार्टीचे आयोजन करून वाढदिवस साजरा करतात. ही बाब व्यसनाधीनता वाढविण्यास कारणीभूत असून अतिशय गंभीर स्वरूपाचे आहे.

आज ग्रामीण भागात व्यसनाधींचे प्रमाण वाढण्यास राजकीय पक्ष, राजकीय पक्षाच्या निवडणुका, निवडणुकीचे निकाल, पराभव, वैवाहिक, धार्मिक कार्यक्रम यात समाजसुधारकाच्या जयंती, वाढदिवस, पोलीस प्रशासनाचे हप्ते, देशी-विदेशी दारूचे अवैध दुकाने ही व्यसनाधीनता वाढविण्यास कारणीभूत आहेत. याची वेळीच दखल घेऊन नियंत्रणांनी आवश्यक आहे. नाहीतर भविष्यात या समस्येचे अतिशय वाईट परिणाम होणार असल्याचे स्पष्ट दिसून येते.

**संदर्भसूची**

1. अहुजा राम, "भारतीय समाजातील समस्या," रावत प्रकाशन, नई दिल्ली
2. कांडलकर, लोणा सुनील, "किशोरावस्था आणि मूल्यशिक्षण," बोके प्रकाशन, गांधीनगर, अमरावती
3. गोखले शरदचंद्र, "सामाजिक विकासाचे प्रश्न आणि धोरण," व्हीनस प्रकाशन, पुणे
4. कुलकर्णी पि. के., "गुन्हेगारीचे समाजशास्त्र," विद्या प्रकाशन, नागपूर
5. www.shodhganga.com